# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/01/2023 (मंगळवार) सकाळ

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. कुही** :–अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा बोडखिपेठ ते खरबी खोबना रोड शिवार येथे दिनांक ०९/०१/२०२३ चे १४.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– महेश अनिल राऊत, वय २२ वर्ष, रा. हिवरा पोष्ट वायगांव ता. समुद्रपुर जिल्हा वर्धा, ह. मु. मानवनगर मौदा हा स्वतंत्र मायक्रोफायनान्स मौदा येथे फिल्ड ऑफीसर म्हणुन कलेक्शन करण्याचे काम करतो. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हा खरबी, खोबना बोडखीपेठ वरून कलेक्शनचे ९२,७३२/– रू. घेवून बोडखीपेठ वरून खोबनाला जात असतांना फिर्यादीच्या मागुन ०३ अज्ञात व्यक्ती मोटरसायकलने येवून चालत्या गाडीची चाबी काढुन गाडी थांबवुन फिर्यादीस ''तुझी बॅग दे नाहीतर तुला मारून टाकीन'' असे म्हणुन पैशाची बॅग ओढत असतांना रोडनी दुसरी मोटरसायकल आल्याने त्यांनी फिर्यादीचे मागील खिशात असलेला पॉकीट जबरदस्तीने काढुन व त्यात असलेले २७००/– रू. घेवून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीतांविरूद्ध कलम ३९२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पोस्टे. कुही मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील वडगाव डॅमचे पाण्यात खुर्सापार शिवार येथे दिनांक ०९/०१/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलेश शिवराम डायरे, वय २८ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२ टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपुर यांचे वडगाव डॅमचे पाण्यात खुर्सापार शिवार येथे सिमेंट कॉक्रेट चे पोलला बांधुन ठेवलेली बोट किंमती अंदाजे १००००/– रू. व बोटीतील मच्छी पकडण्याचे जाळे किंमती अंदाजे ५०००/– रू. असा एकुण १५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी ब. नं. ६८६ मो. क्र. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर